# पाठ – १७

# माहिती मिळविण्याच्या दृष्टीने नागरिकांस उपलब्ध असलेले मार्ग

## नागरिकांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने उपलब्ध मार्ग

महानगरपालिकेची विविध कार्य व महानगरपालिकेतील घटना यांची वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, माहितीपट, प्रदर्शने यांसारख्या मोठ्या प्रमाणावरील जाहिरात देणाऱ्या माध्यमांमार्फत प्रसिद्धी देण्याचा सतत प्रयत्न होत असतो.

नागरिकांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालील सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत:-

१) महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://portal.mcgm.gov.in

२) बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रिका (महानगरपालिकेचे मासिक मुखपत्र)

३) वार्तापत्रे, हॅण्डआऊटस्, स्पष्टीकरण इत्यादी.

४) प्रसिद्धी साहित्य उदा. नागरी दैनंदिनी, नागरी मार्गदर्शिका, दिनदर्शिका, स्टीकर्स, भित्तिपत्रके, माहिती पुस्तिका, महानगरपालिका नगरसेवक/नगरसेविका आणि अधिकारी यादी, इत्यादी प्रकाशने साठ्यासापेक्ष व विक्रीस्तव (साठा असल्यास) उपलब्ध आहेत. तसेच नागरी मार्गदर्शिका महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.